e-news letter

# e जलसेवा Bulletin

Enabling efficient water management
कार्यक्षम जलव्यवस्थापनासाठी

Volume : III Issue : 2 June 2013

Government of Maharashtra
Water Resources Department

• Editor •
T. N. Munde

• Executive Editor •
Sharad Dabhadkar

• Editorial Board •
Mrs. Purnima Desai Mr.Prashant Kadam
Mrs. Dhanashree Limaye Mr.Avinash Patil

**Our Vision** *Transform WRD into modern & service driven department through Information & Communication Technology*

## संपादकीय



आम्ही निर्धार केल्याप्रमाणे ई-जलसेवा प्रणाली अंतर्गत १ मे २०१३ रोजी १९ मोड्यूल्स वापरासाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. नियोजित तारखेप्रमाणे हे साध्य झाल्याचा आम्हाला निश्चितच आनंद व समाधान वाटत आहे. हे साध्य करण्यासाठी पीएमओ कार्यालयातील सर्वांनी मनापासून व अविरत प्रयत्न केले आहेत त्यांचे विशेष अभिनंदन ! ई-जलसेवा बाबत अधिक माहिती देण्यासाठी ४ मे २०१३ रोजी वाल्मी येथे एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. यामध्ये प्रामुख्याने मा. प्रधान सचिव, सर्व कार्यकारी संचालक, मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता स्तरावरील अधिकारी उपस्थित होते. संकेत स्थळाचे मा.प्रधान सचिव यांच्या हस्ते अधिकृतरित्या उद्घाटन झाले. तसेच या कार्यशाळेत ई-जलसेवा पोस्टर चे अनावरण झाले. ६ मे २०१३ ते १७ मे २०१३ या ११ दिवसांच्या बांधकाम कार्य प्रकाराचे मास्टर ट्रेनरचे प्रशिक्षण संपन्न झाले. महाराष्ट्रातील ३९ मंडळातून ५६ मास्टर ट्रेनर्सनी भाग घेतला.

दिनांक २१ व २२ मे २०१३ आणि २३ व २४ मे २०१३ या कालावधीत दोन दिवसीय कार्यकारी अभियंता यांची कार्यशाळेचे आयोजन मेटा नाशिक येथे करण्यात आले होते. या कार्यशाळेत एकूण ९२ कार्यकारी अभियंत्यांनी उपस्थिती दाखवली. व ई-जलसेवाच्या या महत्त्वपूर्ण टप्प्यात विभागातील कार्यकारी अभियंता या घटकाचा सहभाग महत्त्वाचा असल्याने ही कार्यशाळा खुपच उपयुक्त ठरली.

दिनांक २७ ते ३१ मे या कालावधीत मासिक लेखा विषयक एम २४ या मोड्यूल्सचे प्रशिक्षण निवडक विभागातील ३२ प्रशिक्षणार्थींना देण्यात आले.

१ जुलै २०१३ पासून उर्वरित १५ मोड्यूल्स उपलब्ध करुन देण्यासाठी कसोशीने प्रयत्न जारी आहेत. त्याचप्रमाणे नेटवर्कींगची कामे चालू असून ते पूर्ण झाल्यानंतर सर्वांना इंटरनेट सुविधा उपलब्ध होईल.

जलसंपदा विभागातील सर्व मंडळांतर्गत बांधकाम कार्यप्रकारातील मास्टर ट्रेनर्सना प्रशिक्षित करण्यात आले आहे. अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी आपल्या अधिपत्याखाली सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी संबंधीत मास्टर ट्रेनर्स कडून प्रशिक्षण प्राप्त केले आहे याची खात्री करावी. तसेच, प्रशिक्षणासाठी आपल्या मंडळांतर्गतच्या मास्टर ट्रेनर्सना योग्य त्या सोई सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. प्रशिक्षण प्राप्त अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपापल्या प्रकल्पाचा डेटा भरण्यास सुरुवात करावी. भरलेला डेटा कार्यकारी अभियंता यांनी तपासून प्रमाणित करावा व प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करावा. असे आवाहन या निमित्ताने मी आपणांस करीत आहे.

प्रत्यक्ष डेटा भरण्यासाठी वापरावयाच्या संकेत स्थळाचा पत्ता
https://wrd.maharashtra.gov.in
सराव किंवा प्रशिक्षणासाठी वापरावयाच्या संकेत स्थळाचा पत्ता
http://wrdtest.maharashtra.gov.in/portal
सर्व मंडळांना ई-जलसेवा भित्तीपत्रके (पोस्टर्स) पुरविण्यात येत आहेत. हे पोस्टर्स कार्यालयाच्या दर्शनी भागात कृपया लावण्यात यावीत.

## Current scenario of Go live Phase I & way forward

Total 19 modules are live on the auspicious day of 1st May 2013. In the first phase of Go live, modules related to construction, design & support functionality are covered. The site is also available in public domain from 1st May 2013. For few information citizens and farmers are required to register on the portal.

For WRD employees, they have to login into the system using their login IDs. Information about login IDs, data digitization cut off dates & general guide lines for data entry is communicated to all Chief Engineers and Superintending Engineers. They are requested to communicate this to the division offices under their control & get data entry done. All the offices are requested to enter data in respective modules. For this User Manuals of all modules are available in the knowledge store of the system. The data entered in the system must be validated by competent authority. For any help during data entery, helpdesk of e Jalseva is available at Koyna Design Circle, Pune. Users are requested to register their issues/problems on this heldesk.

In depth training and hands on is given to Master Trainers from almost all circles. Master trainers are instructed to train other officers/employees from different offices.

For higher officers Dashboards in graphical format are available once they log into the system. Module wise Crystal as well as portlet reports are available. Using these dashboards and reports, decision making will be easier. For remaining 15 modules, pilot phase is going on. These modules will be live in the next month. Thus all 34 modules will be live in July 2013. So start data entry now & ask us for any help needed.

## ई-जलसेवा संबंधित शासन निर्णय

| क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | कार्यालयाच्या संगणकीय कामकाजामध्ये युनिकोड आज्ञावलीचा वापर करणेबाबत | दि. १०/९/२००८ |
| २. | शासकीय कामकाजात ई-मेलचा वापर | दि. ११/२/२०११ |
| ३. | महाराष्ट्र शासनाचे ई-प्रशासन धोरण. | दि. २३/९/२०११ |
| ३. | जल संपदा विभागाच्या ई-प्रशासन कार्यक्रमासाठी प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय स्थापन करणे बाबत | दि. ९/८/२०१२ |
| ४. | जलसंपदा विभागासाठी प्रकल्प अंमलबजावणी समिती स्थापन करणे बाबत. | दि. १२/३/२०१३ |
| ५. | जल संपदा विभागाचा ई-जलसेवा प्रकल्प राबविण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन पथकांची स्थापना करणेबाबत. | दि. ४/४/२०१३ |
| ६. | ई-जलसेवा प्रणालीमध्ये माहिती भरणे. | प्रस्तावित |

ई-प्रशासन प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय
Website : https://wrd.maharashtra.gov.in e-mail : egovpmo@gmail.com Tel. : 020-25468982

## ई–जलसेवा प्रणालीमध्ये माहिती भरावयासाठी आवश्यक सूचना

१. जलसंपदा विभागाच्या संकेत स्थळाचा पत्ता
https://wrd.maharashtra.gov.in

२. ई जलसेवा प्रणालीमध्ये प्रवेश करण्यासाठी
मुखपृष्ठावरील ई–जलसेवा या बटणाद्वारे अथवा संकेतसंस्थळावरून जलसंपदा कर्मचारी या टॅब मधील ई–जलसेवा प्रकल्पाच्या लिंकद्वारे प्रणालीमध्ये Login करता येऊ शकते. Login करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कार्यालयनिहाय Login IDs ची यादी दि. २७/४/२०१३ च्या पत्रान्वये सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आली आहे.

३. प्रणालीसंबंधी मोड्यूल निहाय User Manual Login केल्यांनतर प्रणालीच्या Knowlger store मध्ये मोड्यल निहाय User Manual उपलब्ध आहेत.

४. प्रणालीमध्ये माहिती भरणेबाबत Go-Live टप्पा १ मधील मोड्यूल्सच्या कामकाजाची सर्व माहिती On Line पद्धतीने भरणे आवश्यक. संबंधित तांत्रिक/अतांत्रिक कर्मचारी/अधिकारी यांनी प्रणालीत भरलेल्या माहितीचे सक्षम अधिकाऱ्यांद्वारे Validation आवश्यक.

- प्राधान्याने भरावयाची माहिती व त्यांचा Cut off Dates यांची यादी दि. २७/४/२०१३ च्या पत्रान्वये सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आली आहे.
- सर्व माहिती दि. १.८.२०१३ पूर्वी भरणे अपेक्षित
- माहिती मराठी अथवा इंग्रजी अशा कोणत्याही भाषेत भरणे शक्य.

सद्यस्थितीत प्रकल्प विषयक सर्व माहिती इंग्रजीमध्ये भरणे अपेक्षित व इतर मोड्यूल्स मधील अतांत्रिक माहिती असेल त्या भाषेत (मराठी/इंग्रजी) भरण्यात यावी.

- माहिती भरताना येणाऱ्या शंकांचे निरसन करण्यासाठी तसेच हार्डवेअर संबंधी अडचणींसाठी मदत केंद्र क्र. ०२०–२५४४०३९३

५. प्रणाली वापरासाठी आवश्यक हार्डवेअर/नेटवर्क
- सद्यस्थितीत आपल्या कार्यालयांतर्गत उपलब्ध असलेले व इंटरनेटद्वारे जोडलेले तसेच या प्रकल्पांतर्गत पुरविलेले अथवा कोणतेही संगणक/लॅपटॉप

६. भरलेल्या माहितीचा आढावा व प्रशिक्षण.
- मास्टर ट्रेनर्स यांनी माहिती भरणाऱ्यांना, प्रशिक्षण देणे व त्यांचे शंका निरसन करणे आवश्यक.
- प्रादेशिक प्रकल्प व्यवस्थापन टीम व मंडळस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन टीम (RPMT/CPMT) यांचे द्वारे आढावा घेतला जाईल.

### अभिनंदन

**मास्टर्स ट्रेनर्स बांधकाम कार्यप्रकार च्या दुसऱ्या तुकडीच्या प्रशिक्षण सत्रात प्रथम आलेल्या श्री.संदीप ओंकार पाटील, स.अ.–२ व दुसरा आलेल्या श्री.चिनावलकर तुषार प्रभाकर, स.अ.–१ यांचे हार्दिक अभिनंदन !**

**मास्टर ट्रेनर श्री. कुमार एच.पाटील सहाय्यक कार्यकारी अभियंता, कोल्हापूर यांनी बांधकाम कार्यप्रकारातील मंडळांतर्गत अधिकाऱ्यांसाठी जोमाने प्रशिक्षण वर्ग आयोजित करीत आहेत. त्यांचे हार्दिक अभिनंदन !**

## ई–जलसेवा वृत्तांत

- **मा.प्रधान सचिव श्री. ई.बी.पाटील यांच्या शुभहस्ते जलसंपदा विभागाच्या नविन संकेतस्थळाचे वाल्मी, औरंगाबाद येथे उद्घाटन. (४ मे २०१३)**
- **बांधकाम प्रकारातील तांत्रिक मास्टर ट्रेनर्सच्या दुसऱ्या तुकडीचे प्रशिक्षण मेटा, नाशिक येथे संपन्न (४६ अधिकारी) (६ ते १७ मे २०१३)**
- **लेखा शाखेविषयीचे एम–२४ मोडूल्सचे प्रशिक्षण मेटा, नाशिक येथे संपन्न (३२ अधिकारी) (२७ ते ३१ मे २०१३)**
- **जलसंपदा विभागातील वरीष्ठ अधिकाऱ्यांसाठी दोन दिवसीय कार्यशाळा (दि. ३१ मे – १ जून २०१३)**

## ई–जलसेवा प्रणालीत लॉग–इन होण्यासाठी हे करुन पहा.

**१. इंटरनेट कनेक्शन चालू आहे का याची खात्री करा.** (Google, Yahoo **इ. वापरुन)**

**२. संकेतस्थळाचा पत्ता संगणकाच्या पडद्याच्या वरच्या बाजूस आलेल्या ॲड्रेसबार मध्ये** https://wrd.maharashtra.gov.in **असा टाईप करा. स्पेलिंग तपासा.**

**३. संकेतस्थळ पूर्ण न उघडल्यास पॉप अप ब्लॉक खालीलप्रमाणे काढा.**
- **लिनक्स ऑपरेटींग सिस्टिमसाठी पडद्याच्या वरच्या बाजूस** edit **वर क्लिक करा. त्यानंतर** preferences **वर क्लिक करा. त्यामध्ये** Block Pop Up block **च्या रकान्यातील ☑ अशी खूण काढून टाका.**
- **विंडोज ऑपरेटींग सिस्टिम मध्ये टूल्स वर क्लिक करुन** allow Pop-ups **वर क्लिक करा.**

**४. आता उघडलेल्या संकेतस्थळावर ''ई–जलसेवा'' वर क्लिक करा.** Login **ची विंडो उघडेल. आपणांस पुरविण्यात आलेल्या** User id **व पासवर्ड टाईप करा. आता आपणांस संबंधित सर्व मोड्यूल्स दिसू लागतील.**

**५. अडचण आल्यास संगणक चालू ठेवून हेल्पलाईन क्र. ०२०–२५४४०३९३ वर फोन करा.**

जलसंपदा विभागातील वरीष्ठ अधिकाऱ्यांसाठी एकदिवसीय ई–जलसेवा कार्यशाळा




जलसंपदा विभागाच्या नवीन संकेत स्थळाचे औपचारीक उद्घाटन



### Be an ICIS e-news author......



We at ICIS e-news letter offer an opportunity to our readers to contribute articles and be a part of a family of ICIS e-news author. In particular, we will appreciate receiving contributions on articles bearing on innovative approach in e-governance, development and use of software in day to day department activities.